महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सेक्टर ११, सरोवर विहार समोर, बेलापूर सीबीडी, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**क्रमांकः- एमडीआर-१३२१/प्र.क्र.३०१/२०२३/छाननी** **दिनांक-२८ ऑक्टोबर, २०२४**

# -: प्रसिध्दीपत्रक:-

शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागांर्तगत प्राप्त झालेल्या मागणी पत्रानुसार सहयोगी प्राध्यापक, सूक्ष्मजीवशास्त्र (Microbiology), वैद्यकीय शिक्षण व संशोधन सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गट-अ (जाहिरात क्रमांक २६५/२०२३) या पदाची जाहिरात दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी विज्ञापित करण्यात आली होती. प्रस्तुत जाहिरातीमध्ये शासनाकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार आर्थिक व सामाजिक दृष्ट्या दुर्बल घटक या वर्गवारीकरीता ०१(सर्वसाधारण) पद आरक्षित होते. सदर मुळ जाहिरातीस अनुसरुन एकुण २० उमेदवारांचे अर्ज आयोगास प्राप्त झाले होते. दरम्यानच्या काळात शासनाच्या सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गाकरीता आरक्षण अधिनियम २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ नुसार शासनाकडून नव्याने सुधारित मागणीपत्र मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने शासनाकडून प्राप्त झालेल्या सुधारित मागणीपत्रानुसार आरक्षणात बद्दल होऊन सदर पद सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग ०१(सर्वसाधारण) या वर्गवारीकरीता आरक्षित करण्यात आले आहे. त्याआधारे दिनांक २१ जून, २०२४ रोजी आयोगाकडून शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुसार नव्याने एकाही उमेदवाराचा अर्ज आयोगास प्राप्त झालेला नाही.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, शुध्दीपत्रकानुसार आरक्षणात बदल झाल्याने दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या विज्ञापित जाहिरातीच्या अनुषंगाने आयोगास प्राप्त झालेल्या २० उमेदवारांचे अर्ज छाननीअंती अपात्र ठरतात. याची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण :- नवी मुंबई**

**उप सचिव, (सरळसेवा छाननी)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**